# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक: १३१-३२) वर्धा, शुक्र-शनिवार ता. २१-२२ ऑ. ६४ (मूल्य १० पैसे


"भारताची अमोल अमानत"

## लो. ना. बापूजी अणे यांचे पू. विनोबाजीस पत्र

### "शरीमाद्यं खलु धर्मसाधनम्' हे प्रथम ध्यानांत घ्या

*(जुन्या पिढीतले सुप्रसिद्ध नेते लोकनायक बापूजी अणे यांना विनोबांची प्रकृति बरी नसल्याचे वृत्तपत्रावरून कळले. तेव्हां बापूजींनी विनोबांना एक पत्र पाठविले. या पत्रात लोकनायकानी विनोबांच्या प्रकृतिबद्दल कळकळीची चिंता व्यक्त केली आहे. पण विनोबांच्या कार्याचे 'जगाच्या ज्ञात इतिहासात अतुलनीय' या शब्दात जे वर्णन केले आहे ते हि तितकेच महत्वाचे व हृद्य आहे. समग्र पत्रच खाली देण्यात येत आहे.)*

पूज्य विनोबाजी यांस,

सा. न. आपली प्रकृति बरी नसल्याबद्दल वृत्तपत्रांतून जी बातमी प्रसिद्ध झालेली आहे ती वाचण्यात आली. १२-१४ वर्षें आपण उतारवयात जे परिश्रम केले; विशेषत: पदयात्रा करून भारताच्या कानाकोपऱ्यातून, दऱ्याखोऱ्यातून, ओसाड वाळवंटातून आणि दाट जंगलातून रहात असलेल्या भारतीयाना भेटून त्यांना आशेचा आणि अभ्युदयाचा संदेश पोचविण्याकरिता जे कष्ट केले, त्याला केवळ भारतातच नव्हे, तर जगाच्याहि ज्ञात इतिहासात तुलनीय अशी दुसरी विश्वसनीय कथा सांगता येत नाही एरवी निकोप असलेले शरीर आता पूर्वीप्रमाणें वाटेल ते सहन करण्याच्या स्थितीत दिसत नाही म्हणून आपणांस एवढीच सूचना प्रेमाने पण भीतभीतच करावीशी वाटते की, 'शरीरमाद्यम् खलु धर्मसाधनम्' हे लक्षांत घेऊनच आपले नित्य आणि नैमित्तिक कार्यक्रम ठरविण्यात यावयाला पाहिजेत.

जडवादाच्या प्रभावाने कठोर व निष्करुण बनत चाललेल्या मनुष्याच्या हृदयांत जी मानवतेची वल्ली आहे, ती सुकून वठू न देता पुन्हा प्रफुल्लित करण्याचे काम एकाद्या यावज्जन्म धर्मसेवा करणाऱ्या व्रतस्थ तपस्व्याकडूनच होऊ शकेल. म्हणूनच माझी आपणास अगत्याची प्रार्थना आहे की, भारतावर आपली जी प्रेमदृष्टि आहे ती दयार्द्रता आणि आपले धर्मसाधन असलेले शरीर ही भारताची अमोल अमानत आहे. तेव्हां त्यास आजपर्यंत जपले त्याहिपेक्षा आता अधिक दक्षतेने जपण्यातच भारताचे आत्यंतिक हित आहे. अधिक काय लिहूं ? आपण भारताच्या आध्यात्मिक वृत्तीचा एकमेव आशांकुर आहांत.

परमेश्वर आपणांस सत्वर आरोग्य देवो व सुदृढ ठेवो अशी प्रार्थना आहे.

---०---

## याहून निश्चित मार्गदर्शन ते कोणते ?

**महंतें महंत करावे । युक्तिबुध्दीने भरावे ।**
**विवर विवरोनि विखरावे । नानादेशीं ॥**

समर्थ रामदास

पुष्कळ ठिकाणी असे ऐकूं येते की, विनोबा उच्च विचार सांगतात; पण व्यावहारिक स्तरावरील निश्चित मार्गदर्शन फारसे करीत नाहीत. असे म्हणणारे सर्वच भूदान-ग्रामदान आंदोलनाकडे सहानुभूतिशून्य दृष्टीने पाहणारे असतात असे समजण्याचे कारण नाही. पण एवढी गोष्ट खरी की, विनोबांची वाणी यथार्थरीत्या अद्यापि अनेकांच्या कानावर जातच नाही.

× × ×

पांच सहा वर्षापूर्वीची गोष्ट आहे माझे एक विद्वान व साहित्यिक मित्र एकदा मला आगगाडीत भेटले. मी म्हटले 'कोठे गेला होता ?' ते म्हणाले 'पुण्याला !–' मग पुण्याची कांही महत्वाची बातमी सांगा !'

माझे मित्र म्हणाले– 'कांही साहित्यिक मित्रांच्या बरोबर पुण्यास गोष्टी होत होत्या. एकाने सहज प्रश्न विचारला– 'आजचा सगळ्यात श्रेष्ठ असा मराठी भाषेतला साहित्यिक कोण ?' कोणी कोणाचे नांव घेतले; कोणी कोणाचे ! ज्याने त्याने आपल्या पसंतीच्या लेखकाचे नांव पुढे मांडले. पुढे माझ्यावर पाळी आली. तेव्हां मी विनोबांचे नांव घेतले. तें ऐकताच एक साहित्यिक उसळून म्हणाले– 'कोण हा विनोबा ? याने कधी व कोणते साहित्य निर्माण केले ? कोणती कादंबरी लिहिली ? आम्ही तर कधी त्याचे नावहि ऐकले नाही ?'

माझा मित्र पुढे सांगू लागला– 'मी त्या साहित्यिक मित्रांना सांगितले की, माझ्या नम्र मते ज्ञानेश्वरानंतर विनोबा एवढा साहित्यिक आजवर झालेला नाही. असे म्हणून विनोबांच्या कांही रचना मी त्यांच्यापुढे मांडल्या. तेव्हां त्याना मोठे आश्चर्य वाटले व विनोबाबद्दल त्यानी आदर व्यक्त केला. प्रारंभी आपण अनादराची भासणारी भाषा बोललो याबद्दल त्यानी खेदहि व्यक्त केला.

× × ×

वरील गोष्टीचे तात्पर्य हेच की, जेथे पुण्यासारख्या ठिकाणच्या साहित्यिकानासुद्धा विनोबा हा कोण प्राणी आहे याची कल्पना नव्हती; तेथे खेडोपाडी पसरलेल्या अगणित जनतेला व लहानमोठ्या कार्यकर्त्यांना–ज्यानी अजून विनोबांना पाहिले नाही– ऐकिले नाही– विनोबांच्या विचारांचा परिचय करून देण्याची किती आवश्यकता आहे हे ध्यानात येईल. म्हणून सर्वोदय साहित्य प्रचाराच्या मोहिमेला फार महत्व आहे.

× × ×

विनोबांचे विचार जितके उच्च असतात तितकेच ते व्यावहारिकहि असतात ही गोष्ट लोकांच्या कानी जास्तीत जास्त प्रमाणात जावयास पाहिजे. उदाहरणार्थ ग्रामदानी कार्यकर्त्यांचे संघटण व त्यांचा कार्यक्रम कसा असावा हाच एक प्रश्न घेतला तर असे दिसून येईल की, अतिशय नि:संदिग्ध शब्दात विनोबांनी मार्गदर्शन केलेले आहे. त्यांनी सांगितले आहे की, दर दहाहजार वसतीमागे एक कार्यकर्ता असावा. तो खेड्यात असेल तर त्याच्या कक्षेत सुमारे ५० गावे येतील. त्याने दररोज सकाळी एका गावाला व सायंकाळी एका गावाला भेट द्यावी. अशारीतीने २५ दिवसात ५० गावांची भेट पुरी करावी. उरलेले ५ दिवस त्याने एकाच ठिकाणी रहावे. त्यावेळीं त्याने चिंतन करावे की, पूर्वी किती काम झाले. व पुढे कोणते काम करावयाचे आहे, त्यातले पुढील महिन्यात किती पुरे करणे शक्य आहे. या पाच दिवसात त्याने नवीन अध्ययन करावे, चर्खा चालवावा व पुरेशी विश्रांतीहि घ्यावी. याप्रमाणे ५ दिवस गेल्यावर पुनः पदयात्रेला निघावे. या पद्धतीने सर्व देशभर काम करण्याइतके मनुष्यबळ नसेल तर एकच जिल्हा निवडा व त्यात काम करून दाखवा. या पदयात्रेत साहित्यप्रचार अवश्य झाला पाहिजे. आपली पत्रिका प्रत्येक गावात पोहचली पाहिजे. घरोघर सर्वोदयपात्र ठेवण्यात आले पाहिजे. गावातील प्रत्येकाशी व्यक्तिश: परिचय करून घेतला पाहिजे.

× × ×

ग्रामदानी कार्यकर्ता हा एक प्रकारचा 'होल्ड ऑल' असला पाहिजे. गावाच्या आवश्यकतेच्या सर्व गोष्टी त्याच्या पडशीतून बाहेर निघू शकल्या पाहिजेत. केवळ ग्रामदान-भूदान एवढाच विषय घेऊन तो खेड्यात जाईल, तर– विनोबा म्हणतात– लोक म्हणतील एक व्याख्यान द्या व चालायला लागा. खेड्यातल्या लोकाना असा अनुभव आला पाहिजे की, या भल्या माणसाच्या पोतडीत प्रत्येक वेळी आपल्या कल्याणाची एकना

(पृष्ठ ४ वर)

www.vinoba.in

